# , प्रकरण ४ थे ,

## प्रकरण ४ थे (क)

## पाठ्यपुस्तकांवर आधारित लेखन पाठाचे नियोजन

## आणि

## लोकसंख्या शिक्षण विषयक आशयासाठी रिक्त जागांचे

## पुथ: करण

| क्र.नं. | विभागाचे शीर्षक | शीर्षक (लेखनाचे) | लेखन प्रकार |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १. | लोक शिक्षण जाणीव पत्रीका | टंचाईच्या भस्मासुर | वैचारिक निबंध |
| २. | पशु पक्षांची अद्भुतरम्य सृष्टी | आमचे वन मित्र | वर्णनपर निबंध |
| ३. | जात पात | सामाजिक विषमता | वैचारिक निबंध |
| ४. | लग्नाचे वय | मुलींचे शिक्षण | वैचारिक निबंध |
| ५. | झाडे पाऊस देतात। | पावसाळ्यातील एक दिवस | निसर्ग वर्णनपर निबंध |
| ६. | स्वस्त राकेल | कोणतीही महागाई | पर्यात्मक निबंध |

# लेखन पाठ आणि पूरक चित्रसंग्रह

पाठ्यपुस्तकांवर आधारीत लेखन पाठामुळे विद्यार्थ्यांना पूरक अध्ययनांस योग्य वाव मिळतो. जीवनाच्या विविध स्वरूपाशी निगडीत असलेल्या लोकसंख्या शिक्षणाच्या संकल्पना व आशयाची मांडणी करून विद्यार्थ्यांना अध्ययनांत प्रवृत्त करता येईल. अशा पुढील क्षेत्रांचा विचार आपणांस करावयाचा आहे. अध्ययन प्रभावी व्हावे म्हणून पूरक चित्रांचा वापरही करावयाचा आहे.

अ) सामाजिक व आर्थिक विकास :-

१) छोटया कुटुंबामुळे कुटुंबांतील मुलभूत गरजा चांगल्या रीतीने भागतात.

२) मुलांच्या संख्येपेक्षा गुणवत्तेला महत्व आहे.

३) स्त्रि पुरूषांचा समान सहभाग.

४) स्त्रि शिक्षण व स्त्रियांना नोकरी.

५) बाल विवाहाचे दुष्परिणाम.

६) छोटया कुटुंबाला साधनसामुग्रीचा ज्यादा हिस्सा.

७) मोठ्या कुटुंबामुळे वाटणीचे वेळी अधिक तुकडे.

८) लोकसंख्याचा बेसुमार वाढीमुळे सामाजिक व आर्थिक जीवनांवर झालेले दुष्परिणाम.

ब) पर्यावरण ( निसर्ग व समाज विषयक )

१) लोकसंख्या व साधन संपत्ती व त्यांचा न्याय उपयोग यात योग्य समतोल.

२] लोकसंख्येच्या बेसुमार वाढीमुळे कमतरता भासणाऱ्या बाबी व घडलेले दुष्परिणाम.

[१] जीवन [२] जमीन [३] पाणी [४] हवा व ध्वनीप्रदूषण [५] वनांचे निर्मूलन [६] जमिनीची झीज [७] जंगली जीवनाच्या नायनाटाची भीती.

३] अधिक लोकसंख्या, अधिक उत्पादन, परंतु उत्पादनाचा तुटपुंजा हिस्सा, असमाधान व सामाजिक गुन्हेगारी.

[क] कौटुंबिक जिवन. :-

१] कमी अपत्यांच्या कुटुंबांत चांगल्या जीवनमानाची जास्त शक्यता.

२] अधिक अपत्यामुळे आईच्या व बाळाच्या आरोग्यांवर विपरीत परिणाम.

३] मुला इतकेच मुलीस महत्व.

४] वनस्पती व प्राणी यांच्या उत्पत्तीतील समतोल.

५] जबाबदार पालकत्व व पालकांची कुटुंबातील भूमीका.

[ड] आरोग्य व आहार :-


१] लहान कुटुंब आरोग्य उत्तम:

२] आरोग्य संपन्न आई व आरोग्य संपन्न मुल.

३] स्वच्छता, पिण्याच्या पाण्याच्या सुरक्षितता, समतोल आहार, आरोग्य कारक सुविधा.


वरील आशयाला धरून लेखनपाठाची तयारी करण्यापूर्वी शिक्षकांनी विद्यार्थ्यांना माहिती गोळा करण्यासाठी आपल्या शेजारील घराचे सर्वेक्षण करण्यास लावावे व त्यांच्यात उत्तम प्रकारची जाणीव जागृती निमार्ण करावी. प्रत्येक विषयावरील

चित्राचा उपयोग करून लेखन पाठ लिहून घ्यावा. त्यामुळे पाठांवर आधारित प्रत्याभरणकार्य व्यवस्थित होईल. पुढील चित्रे विद्यार्थ्यांना या जाणीव निर्मितीच्या कार्यात उपयुक्त ठरतील.




'रस्ता' दिसतोय पण
'मार्ग' हरवलाय

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR






# अभयारण्यातील पर्यटन

# वन्यजीवांच्या संरक्षणाचा आटापिटा कशासाठी?

★ हिमालयातील ...
बकऱ्यांचा रंग
हिवाळ्यात बदल
★ हिमाचल प्रदेशा
बकऱ्यांना ज
सें.मी. पर्यंत व
दाढी असते.

आले
वाळत


बघता बघता सर्व ...






# पशुपक्ष्यांची अद्भुतरम्य सृष्टी






★ मलायी भाषेतील 'ओरांग उटांग' या शब्दाचा अर्थ 'वनमानव' असा होतो.

★ पाढरा शॉर्क माशाला नरमांसभक्षक म्हणून ओळखतात.
★ शॉर्क मासा आपल्या आयुष्यात







★ संजय मानमोडे

# तुम्हाला त्रास होतो का ?

# भयंकर

## जातपात

जातीपाती कोणी निर्माण केल्या ? आपणच !

ज़ातीवरून लोक भांडणे करतात. गावच्या विहिरीवर सगळे पाणी भरतात का ? काही माणसांना पाणी भरायला मनाई असते. याचे कारण, एक जात दुसरीला कमी मानते.

फार पूर्वीच्या काळी कामावरून जाती पडल्या असे म्हणतात.आता क्रिती तरी कामे बदलली आहेत. मग जातपात कशासाठी शिल्लक ठेवायची ? नव्या जगात, माणुसकी हीच सगळ्यांची जात.



# घात केला!

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

## सासरच्या छळाला कंटाळून विवाहितेची आत्महत्या




### लग्नाचे वय

एके दिवशी लक्ष्मीबाई रामरावांना म्हणाल्या,

"आपल्या मुक्ताला सोळावं लागलंय. लग्नाची तजवीज केली पाहिजे. समोरचा प्रभाकर कारकुनीची चांगली नोकरी करतो. आपल्याला जावई करून घ्यावा, की."

रामराव हसले, ते म्हणाले,

"अग,आता लग्नाचा कायदा आहे. मुक्ता अठरा वर्षांची झाली पाहिजे. प्रभाकर आता एकोणीस वर्षांचा आहे. तो बावीस वर्षांचा झाला पाहिजे. त्याआधी दोघांचं लग्न लावून सगळेच तुरुंगात जाऊ की!"

लक्ष्मीबाई म्हणाल्या,

## एक भाषा दुसऱ्या भाषेशी कधीही झगडत नसते




## मुलींना शिक्षण द्या !

शांताबाईला दोन मुली आहेत. विद्या आणि कौसल्या.

शांताबाईला शेजारच्या सीताबाई म्हणाल्या,

"आमच्या घरात नेहमी आजारपण असते. पहिली दोन मुले धष्टपुष्ट होती. तेव्हा आमची कमाई घराला पुरत होती.आता ही पाच मुले पोसायची! पौष्टिक आहार आणायचा कुठून ? कितीही काबाडकष्ट करा, अन्नाचा तुटवडा पडतोच.शांताबाई, तुमच्या दोन मुली नीट वाढवा. माझा सल्ला ऐका.त्यांना चांगले शिक्षण दिले तर त्या मुलांपेक्षा सरस ठरतील."

शांताबाईला हे ऐकून समाधान वाटले.



# साखरेबरोबर आता चहाचीही आयात करावी लागणार !

# रेशनवर देण्यासाठी पुरेसे धान्य नाही तर आम्ही काय करणार?



# लोकसंख्येचा भस्मासुर

## यक्ष प्रश्न

गंभीर समस्या म्हणजे भारतातील लोकसंख्यावाढीचा यक्ष प्रश्न आहे भारतीय नागरिकाने हा प्रश्न समजावून घेऊन त्यावर गंभीरपणे विच आवश्यक आहे.

### जगाच्या लोकसंख्येचा इतिहास


आपणास लोकसंख्येची माहिती अनुमानाने, पुरातत्व विभागाच्या शाखेने केलेल्या संशोधनाच्या आधारे मिळू शकते पृथ्वीतलावर म

प्रा. डॉ. चंद्रकांत नारायण लांडगे
अध्यापक कॉलनी, बार्शी.

भारतात दर दीड सेकंदाला एक बालक जन्मते. दर तासाला १८५० बालकांचा जन्म होतो दर दिवशी ५५ हजार जन्म होतात. दरवर्षी २ कोटी लाखची भर लोकसंख्येत पडते दरवर्षी ऑस्ट्रेलिया खंडातील लोकसंख्येएवढी भारतात पडते. अमेरिका आणि युरोप खंडातील लोकसंख्येएवढी लोकसंख्या

आपले हात झाडे लावतात.
पण आपलेच हात झाडे तोडतात.
झाडे तोडू नका.
झाडे वाढवा.

## झाडे पाऊस देतात





झाडे वाढली की पाऊस येईल.
शेतीभाती चांगली पिकेल.
चारापाणी भरपूर मिळेल.
चांगला पाऊस झाडामुळे मिळतो.
पावसाळा भारी आनंदाचा ऋतू.

— वृक्ष लावणारे निघोनिया जाती।
तळी विसावती सान थोर॥

हात झाडे लावतात

भाववाढीस जबाबदार कोण? जीवनोपयोगी वस्तूंचे वाटप

## स्वस्त रॉकेल



स्वस्त रॉकेलसाठी दुकानासमोर रांग लागली होती. विक्रम आईला म्हणाला, 'पैसे दे लवकर. रॉकेलची विक्री चालू आहे.'' पाच लिटरसाठी सरस्वतीने पंधरा रुपये दिले.

रांगेत नंबर येताच, विक्रमने डबा आणि पैसे दुकानदारासमोर ठेवले.'' दुकानदार म्हणाला, ''पंधरा रुपये पुरणार नाहीत.'' विक्रम म्हणाला, ''जास्त का मागता?'' विक्रमला वाईट शिव्या देऊन दुकानदार म्हणाला, ''जा रे, भिकाऱ्या! तक्रार कर जा, साहेबाकडे.'' विक्रमच्या मागे उभा असलेला माणूस बोलला, ''अहो, दुकानवाले, व्याज घेता की काय आमच्या पैशावर? असा कसा वाकडा व्यवहार हो, तुमचा?''